हैं तय्यार हम...

मी धावणार माझ्यासाठी

आरोग्याच्या दृष्टीने धावणे हा व्यायाम महत्त्वपूर्ण आहे. त्वचेचे आरोग्य वाढण्यास त्यातून हातभार लागतो. 'लोकमत'तर्फे आयोजित केलेली मॅरेथॉन स्पर्धा हा अतिशय चांगला उपक्रम आहे. यामध्ये लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांना सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. या मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होऊन मी स्वत:देखील धावणार आहे.

-डॉ. उज्ज्वला दहीफळे, अध्यक्षा, औरंगाबाद सर्जिकल सोसायटी

फर्स्ट आयडिया एज्युकेशन ग्रुप... फर्स्ट आयडिया एज्युकेशन ग्रुपचे (डावीकडून) धम्मपाल मिसाळ, संजय शिरसाठ, पंकज पाटील, शेख समीर, आशिष चव्हाण, माधव बडे, वसंत सोनवणे, बाळकृष्ण घोसे, प्रवीण देशपांडे, वैभव पांडे, साळूबा कुलकर्णी, मिलिंद कळंबे, सचिन मलिक, योगेश अंभोरे, सचिन पवार, दादासाहेब जाधव, मधुकर थोरात, दीपाली काकडे, पल्लवी थोरात, ज्योती सुलताने, अमरान सुलताना, रोहिणी डहाळे आणि किरण वासनिक.

खिंवसरा ग्रुप... खिंवसरा ग्रुपचे (डावीकडून) अनिल तोतला, राजेंद्र पाठक, अजय कावडिया, कृष्णा अवलगावकर, शेख नजीर, रुपेश वाघ, फिलिप वायदंडे, गोपाल बजाज. (पुढच्या रांगेत) अंजली वैद्य, रोहिणी चव्हाण, उषा बागूल आणि गोपाल भिंगारे.

ग्रुप बुकिंगसाठी त्वरा करा

महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग लवकरात लवकर निश्चित करावा. ही नोंदणी लोकमत भवन, रिगल लॉन, जालना रोड येथे सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत करता येईल. या स्पर्धेत शाळा, महाविद्यालये, कंपनीमधील कर्मचारी, रनर्स ग्रुपही एकत्रितरीत्या सहभाग घेऊ शकतात. या महामॅरेथॉनच्या नोंदणीत जास्तीत जास्त धावपटू, नागरिकांनी सहभाग नोंदवावा.

अधिक माहिती व ग्रुप बुकिंगसाठी ९९२१०३०७००, ०२४०-३०२१७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. या महामॅरेथॉनमध्ये नोंदणी ऑनलाइनही करता येईल. त्यासाठी धावपटूंनी www.mahamarathon.com या संकेतस्थळावर जावे.

स्पर्धा
- Half Marathon - 21 Kms
- Power Run - 10 Kms
- Fun Run - 5 Kms
- Family Run - 3 Kms

'लोकमत'च्या भूमिकेवर शिक्कामोर्तब : प्राचार्यांची घेतली बैठक

'अभियांत्रिकी'चे होम सेंटर रद्द होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

१६ एप्रिल २०१७ रोजी प्रकाशित वृत्त

२३ एप्रिल २०१७ रोजी प्रकाशित वृत्त

औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयात परीक्षेसाठी दिले जाणारे होम सेंटर रद्द करण्याचा निर्णय परीक्षा विभागाने घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी परीक्षा विभागाने पूर्ण तयारी केली असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. दिगंबर नेटके यांनी दिली. मागील दोन सत्रांपासून 'लोकमत'ने होम सेंटरमध्ये होत असलेल्या गैरप्रकारावर प्रकाश टाकला होता. यावर आता परीक्षा विभागाने शिक्कामोर्तब केले.

विद्यापीठाशी संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयातील अभ्यासक्रमांच्या प्रात्यक्षिक परीक्षांना १५ नोव्हेंबर आणि लेखी परीक्षांना २८ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. या परीक्षेच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या प्राचार्यांची बैठक सोमवारी घेण्यात आली. या बैठकीमध्ये विविध विषयांवर चर्चा झाली असल्याचे डॉ. नेटके यांनी सांगितले. मागील सत्रात १६ मे रोजी मध्यरात्री साई इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयामध्ये झालेल्या परीक्षांच्या उत्तरपत्रिकांचे सील तोडून मध्यरात्री शिवसेना नगरसेवक सीताराम सुरे यांच्या घरात लिहिताना २७ विद्यार्थ्यांना आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने रंगेहाथ पकडले होते. या प्रकरणामुळे विद्यापीठाची बदनामी देशभर झाली. याची दखल घेत विद्यापीठ प्रशासनाने साई अभियांत्रिकीची संलग्नता रद्द केली आहे. या घडलेल्या प्रकारापासून धडा घेत यावेळी अभियांत्रिकीच्या सत्र परीक्षांना होम सेंटर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व अभियांत्रिकीच्या प्राध्यापकांना विश्वासात घेत नियोजन करण्यात येत असल्याचे डॉ. नेटके म्हणाले. होम सेंटर रद्द करताना बीड, परळी, तुळजापूर, अंबाजोगाई आणि उस्मानाबाद येथील परीक्षा केंद्रांचा नव्याने विचार करावा लागत आहे. या ठिकाणी केवळ एकच अभियांत्रिकी महाविद्यालय असल्यामुळे होम सेंटर रद्द करताना नवीन पर्यायांचा विचार सुरू आहे. या ठिकाणचे होम सेंटर रद्द केल्यास या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दुसऱ्या गावी जाऊन परीक्षा द्यावी लागणार असल्यामुळे अधिक पर्याय शोधण्यात येत आहेत. यासाठी अभियांत्रिकीच्या प्राचार्यांची आणखी एक बैठक बोलावण्यात आली.

नियोजनासाठी समितीची स्थापना

- होम सेंटर रद्द केल्यामुळे ऐनवेळी नियोजनात गोंधळ होऊ नये, एम-४ या विषयाला सर्वाधिक विद्यार्थी असल्यामुळे सर्व महाविद्यालयांच्या क्षमतेनुसार परीक्षार्थींचे वाटप झाले पाहिजे. यासाठी पाच प्राचार्यांचा समावेश असलेल्या समितीची स्थापना करण्यात आली आहे. यात डॉ. हरिरंग शिंदे, डॉ. उल्हास शिऊरकर, डॉ. उल्हास शिंदे, डॉ. संतोष भोसले, डॉ. नीलेश पाटील यांचा समावेश आहे.

उत्तरपत्रिका प्रत्येक दिवशी गोळा करणार

साई अभियांत्रिकी महाविद्यालयातच उत्तरपत्रिका ठेवण्यात आल्यामुळे तो प्रकार घडला होता. यामुळे यावेळी सर्व पेपरच्या उत्तरपत्रिका त्याच दिवशी विद्यापीठाकडे पाठविण्याची व्यवस्था केली आहे. पेपर संपल्यानंतर तात्काळ सर्व उत्तरपत्रिका घेऊन विशेष गाड्या विद्यापीठाकडे रवाना होणार असल्याचे डॉ. नेटके यांनी सांगितले, तर इतर परीक्षेच्या उत्तरपत्रिकाही तालुक्याच्या ठिकाणी गोळा करण्यात येत आहेत. तेथून मूल्यांकन केंद्रांवर जमा केल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थाचालकांचा दबाव येण्याची शक्यता

'साई'कांड घडले त्या सत्रावेळी सुरुवातीला कुलगुरुंनी अभियांत्रिकीचे होम सेंटर रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाला ४८ तास होण्याच्या अगोदरच कुलगुरुंनी यू-टर्न घेत संस्थाचालकांच्या दबावात होम सेंटर पूर्ववत करण्याचा निर्णय २९ एप्रिल रोजी घेतला. यानंतर १६ मे च्या रात्री साईकांडचे बिंग फुटत होम सेंटरचा पर्दाफाश झाला होता.

Govt Reg.No.7342
पेन केअर इंस्टीट्युट
ऑर्थोपेडीक सर्जन द्वारे सल्ला व उपचार

सांधेवात, गुडघेदुखी, मान, पाठ,कंबरदुखी मायग्रेन (डोकेदुखी), फ्रोझन शोल्डर (खांदेदुखी) सायटीका, स्लिप डिस्क, टाचदुखी, टेनिस ऐल्बो हातापायात मुंग्या येणे
अपना बाजार, बाफना ज्वेलर्स समोर, जालना रोड, औरंगाबाद.
9822899660, 9422713387, 9767442040
(कृपया अपॉईंटमेंट घेऊनच येणे)
सोमवार ते शुक्रवार फक्त

आता प्रथमच सेक्स समस्यांवर अत्याधुनिक विदेशात प्रचलित लेझर व व्हॅक्युम थेरेपी उपचार
विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी एम.बी.बी.,एस.एम.डी. डॉक्टरांचा सल्ला
हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, इंद्रीय शिथिलता, पुरुष वंधत्व
हायपोगोनॅडिझममुळे इंद्रीय समस्या, मधुमेहामुळे आलेली लैंगिक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या कमी असणे. ॲझुस्पर्मीया: शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.

आशाकिरण क्लिनीक
१९८५ पासुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन केंद्र
३८, निराला बाजार, बाटा शोरुम समोर, औरंगाबाद. वेळ - स.११ ते ३ व सायं.७ ते ९ शनिवार रविवार बंद
कृपया अनावश्यक खर्चीक व फसव्या उपचारापासुन सावध मो. 7769856821 9767132521

जि. प. आरोग्य कर्मचाऱ्यांचे उद्यापासून उपोषण

उदासीनता : सातत्याने पाठपुरावा करूनही प्रशासनाचे दुर्लक्ष

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. या प्रश्नांकडे जिल्हा परिषद प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेने १५ नोव्हेंबरपासून जि.प. मुख्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे.

यासंदर्भात संघटनेचे जिल्हाध्यक्ष बी. एफ. बैनाडे व राज्य कार्यकारी अध्यक्षा प्रमिला कुंभारे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी मधुकरराजे आर्दड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विवेक खतगावकर यांना उपोषणाची नोटीस दिलेली आहे. या नोटिशीत म्हटले आहे की, यापूर्वी २२ ऑगस्ट २०१६ रोजी संघटनेने आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत लाक्षणिक उपोषण केले होते.

त्यानंतर ४ जुलै रोजी जि.प. मुख्यालयासमोर याच प्रश्नांसंबंधी आंदोलन केले होते. यासंदर्भात आजपर्यंत सातत्याने निवेदने देऊन कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला; परंतु आजपर्यंत प्रशासनाने आरोग्य कर्मचाऱ्यांचा एकही प्रश्न सोडविलेला नाही. त्यामुळे आरोग्य कर्मचाऱ्यांमध्ये प्रशासनाविरोधी प्रचंड असंतोषाची भावना निर्माण झाली आहे.

लासूर स्टेशन प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांना केवळ एका सामाजिक संघटनेच्या दबावाखाली येऊन चुकीच्या पद्धतीने निलंबित केले आहे.

त्या कर्मचाऱ्यांचे निलंबन त्वरित रद्द करून त्यांना पुनर्स्थापना देण्यात यावी, आरोग्यसेवक, सेविका, आरोग्य सहायक, सहायिकांना आश्वासित प्रगती योजनेंतर्गत १२ व २४ वर्षांचा लाभ देण्यात यावा, आरोग्यसेविकांच्या सेवापुस्तिका अद्ययावत करण्यात याव्यात, आरोग्य कर्मचाऱ्यांची रखडलेली पदोन्नती तात्काळ करण्यात यावी, आरोग्यसेविकांचा सेवाखंड क्षमापित करण्यात यावा या व अन्य मागण्यांसंबंधी उपोषण केले जाणार असल्याचे संघटनेने कळविले आहे.

लोकमत व व्हीआयटी आयोजित 'फ्युचर मंत्रा' कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थी व पालक. समोर संवाद साधताना भूपेश दवे आणि प्रा. डॉ. विनोदकुमार शर्मा.

करिअर मार्गदर्शन : लोकमत व व्हीआयटी आयोजित उपक्रमाला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

'फ्युचर मंत्रा' ने दिला नवा आत्मविश्वास

लोकमत न्यूज नेटवर्क

- तंत्रज्ञानात सातत्याने होणाऱ्या प्रगतीमुळे काल लोकप्रिय असणारे तंत्रज्ञान आज दिसत नाही. तसेच आज जे आहे, त्या तंत्रज्ञानात उद्या कमालीचा बदल होणार आहे. हा बदल लक्षात घेऊन करिअरच्या वेगळ्या वाटा लक्षात घ्या. स्वत:चे कौशल्य लक्षात घेण्यासाठी व्हीआयटी युनिव्हर्सिटीची मदत घ्या, 'झीरो ते हीरो' असा प्रवास करण्यासाठी व्हीआयटी तुम्हाला निश्चितच मदत करील, असा विश्वास त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

लोकमत | VIT UNIVERSITY | Future मंत्रा

औरंगाबाद : आज आपल्यासमोर करिअरचे अनेक पर्याय आहेत. यामधून आपला कल लक्षात घेऊन उत्तम पर्याय कसा निवडायचा हे विद्यार्थ्यांनी 'लोकमत' आणि व्हीआयटी युनिव्हर्सिटीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित फ्युचर मंत्रा या कार्यक्रमातून जाणले आणि सर्वच विद्यार्थ्यांना करिअरसंबंधी एक नवा आत्मविश्वास मिळाला.

रविवार, दि. १२ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे लोकमत आणि व्हीआयटी आयोजित 'फ्युचर मंत्रा' कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भूपेश दवे, प्रा. डॉ. विनोदकुमार शर्मा यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. यानंतर दवे आणि प्रा. डॉ. शर्मा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

संपूर्ण शिक्षण हा जवळपास २२ ते ३० वर्षांचा सोहळा आहे. हा सोहळा साजरा करण्यासाठी सुरुवातीपासूनच कसून तयारी करा. आज स्पर्धेत टिकून राहायचे असेल तर तुम्हाला सगळ्यांपेक्षा एक पाऊल पुढे राहिले पाहिजे. यासाठी अगदी सुरुवातीपासून तुमचे ध्येय निश्चित करा, तुमच्या आवडी निवडी जाणून घ्या. स्वत:वर विश्वास ठेवा, अशा शब्दांत दवे यांनी मुलांना नवी प्रेरणा दिली.

यानंतर दुसऱ्या सत्रात प्रा. डॉ. शर्मा यांनी विद्यार्थ्यांना चैन्नई, वेल्लोर, भोपाळ आणि आंध्र प्रदेशात असणाऱ्या व्हीआयटी युनिव्हर्सिटीबाबत सविस्तर माहिती दिली.

विद्यार्थ्यांना अद्ययावत ज्ञान देण्याचा व्हीआयटीचा प्रयत्न असतो, असे त्यांनी स्पष्ट केले. भव्य कॅम्पस, सुसज्ज वर्गखोल्या, कॅम्पस मुलाखतींद्वारे विद्यार्थ्यांना बहुराष्ट्रीय कंपनीत मिळणाऱ्या संधी याविषयी माहिती दिली. ते म्हणाले की, व्हीआयटीच्या उत्कृष्ट शिक्षण पद्धतीमुळे आज अनेक परदेशी विद्यार्थी तेथे शिक्षण घेत असून, तुम्हीही उत्तम करिअर घडविण्यासाठी व्हीआयटीची मदत घ्या, अशा शब्दांत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या सेमिनारमुळे करिअरचे अनेक पर्याय समजले, अशा शब्दांत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिक्रिया दिल्या.